

साधन
हेल्पलाइन
022-2411 4000

# एचआयव्ही/एड्स आणि पोलीस



## तुम्ही

**नकळत जीवावरचा धोका ओढवून घेत आहात काय?**

... तुम्ही समाजाचे रक्षक आहात म्हणून आम्हाला तुमचा अभिमान वाटतो.

गुन्हेगारांचा सामना करीत असतानाही
स्वतःचे व पर्यायाने तुमच्या कुटुंबाचे एचआयव्ही/ एड्स
पासून संरक्षण करणे हे सुध्दा तुमचे कर्तव्य आहे.

व्यसनाधीनता, क्षयरोग (टीबी), एड्स इत्यादींचा
समाजात मोठया प्रमाणात प्रसार झालेला आहे.
या सर्व समस्यांविरूध्द आपल्याला
सकारात्मक व माणुसकीयुक्त लढा द्यावयाचा आहे.



## गणवेषधारी व्यक्तींना असणारा एचआयव्हीचा धोका

- मुंबई पोलीसदल हे पोलीसांसाठी, एकात्मिक एचआयव्ही समुपदेशन व तपासणी केंद्र याचे आयोजन करणारे भारतातील पहिले पोलीस दल आहे.



# एचआयव्ही / एड्स विरूध्दच्या लढ्यात आपलेही सहकार्य फार मोलाचे आहे. तुम्ही सुध्दा

## एचआयव्ही/एड्स विरूध्दच्या लढ्यात महत्त्वाचे सहाय्यक आहात

**रोजगारासाठी एचआयव्ही चाचणी 'न' करणे:** रोजगार उपलब्ध करून देण्यासाठी एचआयव्ही संबंधातील वैयक्तिक माहितीविषयी गोपनियता बाळगली जावी.

**निरंतर रोजगार संबंध:** एचआयव्ही बाधीत व्यक्तीस कामावरून काढून न टाकता त्याच्या शारीरीक योग्यतेनुसार त्यास काम उपलब्ध करून द्यावे.



**प्रतिबंध:** एचआयव्ही संसर्ग टाळता येतो. सामाजिक उपक्रमांमध्ये माहिती,शिक्षण, वर्तनात बदल या माध्यमांतून प्रतिबंध करणे आवश्यक आहे.

**देखभाल व आधार:** कार्यस्थळी एचआयव्ही ग्रस्तांना ऐच्छिक समुपदेशन व चाचणी, कुंटुब साहाय्य कार्यक्रम योजना, आरोग्य विमा व इतर व्यवसाय योजना पुरवणे जरूरी आहे.




सर्व कर्मचाऱ्यांना परवडणाऱ्या आरोग्य सेवा मिळण्याचा हक्क आहे. ज्यात समुपदेशन व चाचणी, एआरटी उपचार, गुप्तरोगांवर उपचार, संधीसांधू रोगांवर उपचार आणि इतर वैधानिक व व्यवसायिक योजनांचा समावेश होतो. उपचार सेवांच्या उपलब्धतेमुळे गोपनीय ऐच्छिक एचआयव्ही चाचणी करण्यास प्रोत्साहन मिळते ज्यामुळे वेळीच उपचार घेतले जातात व प्रतिबंधास साहाय्य होते.

## कार्यजगत आणि एचआयव्ही/एड्स बाबत राष्ट्रीय धोरण

**(राष्ट्रीय एड्स नियंत्रण संघटना व श्रममंत्रालय द्वारा मान्यताप्राप्त)**

एचआयव्ही/एड्स, कार्यजगताशी



**निगडीत मुद्दा:** एचआयव्ही/एड्समुळे कर्मचारी व कार्यस्थळ दोन्ही प्रभावित होत असल्याने एचआयव्ही/एड्स ही कार्यजगताशी संबंधीत बाब आहे.



**भेदभावरहीत व्यवहार:** वास्तविक वा कथित एचआयव्ही स्थितीच्या आधारावर कोणत्याही व्यक्तीस भेदभाव पुर्ण व लांच्छनास्पद वागणूक देण्यात येऊ नये.

**लैंगिक समानता:** जैविक, सामाजिक, सांस्कृतिक आणि आर्थिक कारणांमुळे पुरूषांपेक्षा महिला एचआयव्ही/ एड्समुळे जास्त प्रमाणात प्रभावित व संसर्गित होतात. त्यामुळे स्त्रीयांमधील एचआयव्हीचा संसर्ग टाळण्यासाठी लैंगिक समानता व महिला सक्षमीकरण यावर अत्याधिक भर देण्यात यावा.



**कार्यस्थळी आरोग्यदायी वातावरण:** कार्यस्थळी आरोग्यदायी वातावरण ठेवावे व कर्मचाऱ्यांना त्यांच्या आरोग्य व क्षमतेनुरूप काम उपलब्ध करून द्यावे.

**सामाजिक संवाद:** सामाजिक संवाद असणे अत्यंत महत्वपुर्ण आहे. कारण, मालक/ नियोक्ता, कर्मचारी व शासन यांमधील समन्वय व विश्वासावर एचआयव्ही/एड्स संदर्भातील धोरणाच्या अंमलबजावणीची यशस्वीता अवलंबून आहे.





## एचआयव्ही/ एड्स म्हणजे काय?

**A** ॲक्वायर्ड– बाहेरून आलेला

**I** इम्युनो– रोगप्रतिकार शक्ती

**D** डेफिशिअन्सी– कमी झाल्यामुळे

**S** सिंड्रोम– दिसणाऱ्या वेगवेगळया लक्षणांचा समुह

**H** ह्युमन– मानवातील

**I** इम्युनो डेफिशिअन्सी– रोगप्रतिकारक शक्ती कमी करणारा

**V** व्हायरस– विषाणू


## एचआयव्ही/ एड्सचा संसर्ग

एचआयव्ही विषाणु संसर्गित व्यक्तीच्या रक्तात, वीर्यात किंवा योनीस्त्रावात असतात. दोन व्यक्तींतील या स्त्रावांच्या देवाणघेवाणीतून विषाणूचा प्रसार होतो.

## एचआयव्ही प्रसाराचे मार्ग




- असुरक्षित लैंगिक सबंधातून




- संसर्गित रक्तदात्याचे रक्त शरीरात चढविले गेल्याने

एचआयव्ही बाधित पुरूषाच्या वीर्यात आणि बाधित स्त्रीच्या योनीस्त्रावात हे विषाणू असतात. बाधित व्यक्तीशी लैंगिक सबंध ठेवल्यास दूषित स्त्रावांच्या सरमिसळीतून एचआयव्हीचा प्रसार होऊ शकतो.

एचआयव्ही बाधित व्यक्तीचे रक्त गरजू रूग्णास चढविले गेल्यास, रक्तातील विषाणू त्या रूग्णाच्या शरीरात शिरतात.

# एचआयव्ही प्रसाराचे मार्ग



• एचआयव्ही बाधित गरोदर स्त्रीकडून होणाऱ्या बाळाला




• दुषित सूया/उपकरणे वापरली गेल्यास

एचआयव्ही बाधित व्यक्तीच्या रक्ताने दूषित झालेल्या सुया, उपकरणे योग्य प्रकारे निर्जंतुक न करता, दुसऱ्या व्यक्तीसाठी वापरली गेल्यास विषाणूचा प्रसार होऊ शकतो. अंमली पदार्थाचे सुयांवाटे सेवन करणारे व्यसनी लोक एकमेकांच्या सुया निर्जंतुक न करता वापरतात. त्यामुळे त्यांना एचआयव्ही संसर्ग होऊ शकतो.
गरोदर स्त्रीला एचआयव्ही संसर्ग झाला असेल तर होणाऱ्या बाळाला वारेतून, बाळंतपणाच्या वेळी किंवा जन्मानंतर आईच्या दूधातून एचआयव्हीची लागण होऊ शकते.

# एचआयव्ही संसर्गाचे निदान

एचआयव्ही संसर्गाचे/एड्सचे निदान रक्तचाचणीने करतात. एचआयव्ही विषाणूच्या विरूध्द शरीरात संरक्षक द्रव्य (अँटिबॉडी) तयार होते. ते या रक्तचाचणीने कळते.



# विंडो पिरीयड म्हणजे काय?

एचआयव्ही विषाणू शरीरात शिरल्यावर, त्या विषाणूविरूध्द अँटिबॉडी तयार होण्यास ६ आठवडे ते ३ महिने एवढा काळ लागतो.
या कालावधीत रक्तात व लैंगिक स्त्रावात एचआयव्ही विषाणू असले तरीही शरीरात अँटिबॉडी नसल्याने, रक्तचाचणी नकारार्थी येते व संसर्गाचे निदान होऊ शकत नाही. यालाच विंडो पिरीयड म्हणतात.



# पोलीसांची भूमिका

- नागरिकांचे कल्याण व पिडितांचे रक्षण हा कायदयाचा आत्मा आहे. म्हणून यात पोलीसांचा सहभाग महत्त्वाचा आहे.
- अशाप्रकारे पोलीस, एचआयव्ही प्रसार नियंत्रणात महत्त्वाची भूमिका बजावू शकतात.
- परिस्थितीमुळे बळी पडलेल्या देहविक्रेत्यांबाबत पूर्वग्रहविरहित, सहानुभूतिपूर्ण व मानवी दृष्टीकोन ठेवणे.
- कंडोम बाळगल्याने देहविक्री करीत असल्याचे गृहित धरून, करण्यात येणाऱ्या अटका टाळणे.
- पोलीसांनी कंडोम वापराचा प्रसार करणे, स्त्रियांचा देहविक्रीसाठी व्यापार करणारे दलाल, गुंड व देहविक्रेत्यांचे शोषण करणाऱ्या व्यक्ती यांना शोधून त्यांना अटक करणे.
- देहविक्रेत्यांवरील अत्याचार थांबवणे, तसेच त्यांचे नागरिक म्हणून असणारे हक्क मान्य करणे.
- मुंबई पोलीस कायदयाच्या (बी.पी.ॲक्ट) कलम ११०,११२, ११७ व इम्मोरल ट्रॅफिकिंग ॲन्ड प्रिव्हेन्शन ॲक्ट(आयटीपीए) च्या ८ कलमाची खऱ्या अर्थाने व सदहेतुने अंमलबजावणी करणे. एचआयव्ही / एडस विरूध्दच्या लढयात त्यामुळे एक मोठा बदल नक्कीच घडून येईल.
- तृतियपंथी गट हा आपल्या समाजातील शैक्षणिक सामाजिकरित्या मागासलेला वर्ग आहे. असे न्यायालयाने नमूद केले आहे. त्या दृष्टीने त्यांच्या समस्या, जसे की लैंगिक शोषण, अत्याचार इ. व गंभीरपणे आणि संवेदनशीलरित्या हाताळण्याची गरज आहे. आणि पोलीस यामध्ये महत्वाची भुमिका पार पाडू शकतात.

# मुंबईतील पोलीसांनी विशेष लक्ष देण्याच्या बाबी



- वांरवार होणाऱ्या अटकसत्रांमुळे देहविक्रय अत्यंत छुप्या रीतीने चालतो व त्यामुळे गुप्तरोगांना बळी पडण्याची शक्यता तर वाढतेच आणि देहविक्रय करणाऱ्यांचे शोषणही होते.





- देहविक्रय करणाऱ्या व्यक्तीवर होणारे शारिरीक अत्याचार व लैंगिक शोषण यामुळे या व्यक्तींना एचआयव्ही संसर्ग होऊ शकतो.

- देहविक्री करीत नसतांना देखील अटक होणे.
- कंडोम बाळगणे हा देहविक्रीच्या व्यवसायात असण्याचा पुरावा पोलिसांकडून समजला जातो.
- वारंवार धाडी टाकल्याने स्त्रियांवर, तृतियपंथी यांवर रस्यावर व उघडयावर व्यवसाय करण्याची पाळी येते.
- देहविक्रेत्यांना कंडोम, एचआयव्ही इत्यादीचे शिक्षण देणाऱ्यांना ते केवळ देहविक्रेत्यांच्या संपर्कात आहेत म्हणून संशयित समजले जाते.
- एचआयव्ही विरूध्दच्या लढ्यात सर्व पोलीसांकडून समान तऱ्हेचे सहकार्य मिळत नाही.



# एचआयव्ही/एड्स यामुळे पसरत नाही



एकत्र जेवण केल्याने




खोकल्याद्वारे, हवेतून




हस्तांदोलन वा आलिंगनाद्वारे



सार्वजनिक शौचालय वापरल्याने




मच्छर, ढेकूण चावल्याने,
एकमेकांचे कपडे वापरल्याने



एड्स रोग्याची काळजी घेतल्याने,
चुंबनाद्वारे किंवा आलिंगनातून

# एचआयव्ही/एड्स आजाराचे टप्पे

- एचआयव्ही संसर्ग झाल्यानंतर सुरूवातीची काही वर्षे कोणतीही लक्षणे नसतात.
- रोगप्रतिकार शक्ती विषाणूंमुळे हळूहळू कमी होत जाते. ८ ते १० वर्षानंतर लक्षणांना सुरूवात होते. सारखा येणारा हलका ताप, वारंवार होणारे जुलाब व त्यामुळे वजनात होणारी घट ही लक्षणे दिसून येतात.




- एड्स या रोगात रोगप्रतिकार शक्तीच नष्ट झाल्यामुळे इतर कोणत्याही रोगांचे जंतू शरीरावर सहजतेने हल्ला करू शकतात. त्यामुळे व्यक्ती वारंवार आजारी पडते, आजार नेहमीच्या उपचारांनी बरे होत नाहीत व एकाच वेळी अनेक आजारांची लक्षणे आढळून येतात.
- एड्स या रोगात लसिकाग्रंथींना सुज, क्षयरोग होऊ शकतो. वारंवार, वेगवेगळया भागावर नागिण येऊ शकते. तोंडात, घशात दह्यासारखे चट्टे येतात. मेंदूत विषाणूंचा प्रार्दुभाव झाल्यास स्मरणशक्ती नष्ट होते, लघवी, संडासवरील ताबा सुटतो.



# दूषित रक्ताच्या संपर्कात आल्यास करावयाची उपाययोजना

## संपर्कानंतर ताबडतोब

- ✔ त्वचेवरील जखमा आणि कापलेल्या जागा साबणाने स्वच्छ धुवा.
- ✔ तोंड व त्वचेवर उडालेले रक्ताचे शिंतोडे भरपूर पाण्याने धुवा.
- ✔ डोळयांवर स्वच्छ पाणी, सलाईन किंवा निर्जंतुक पाण्याने हबके मारा.
- ✘ प्रतिक्रिया म्हणून जखम झालेला भाग तोंडात घालू नका अथवा बोटाला इजा झाल्यास बोट चोखू नका.

## संपर्काविषयी माहिती

- ताबडतोब जवळच्या सरकारी/महानगरपालिका रूग्णालय किंवा शक्ती क्लिनीकला भेटा व आणीबाणी आहे, असे समजून उपचार घ्या.
- संपर्कानंतरचे त्वरीत उपचार- पोस्ट एक्पोजर प्रॉफिलॅक्सिस (पीईपी) करण्याची शिफारस करणे. शक्यतो २ तासांच्या आत व जास्तीत जास्त ७२ तासांच्या आत पीईपीला सुरूवात केली पाहिजे.

## संपर्कानंतरचे पीईपी (एआरटी) उपचार

- पीईपी उपचार घेण्याचा निर्णय हा एचआयव्ही विषाणुशी झालेल्या संपर्काच्या तीव्रतेवर आणि एचआयव्ही बाधित व्यक्तीच्या परिस्थितीवर अवलंबून असतो.



# डयूटीवरील धोक्याच्या शक्यता

## एचआयव्ही संसर्गाची कारणे



- एचआयव्ही बाधित व्यक्तीचे रक्त लागलेल्या तीक्ष्ण अवजारामुळे झालेली जखम
- एचआयव्ही बाधित व्यक्तीची फाटलेली त्वचा, जखमांतून वाहणारे रक्त यांच्याशी संपर्क आल्यास
- जर तुमची त्वचा कापलेली असेल व तुमच्या शरीरावर बाधित रक्त/शारिरीक द्रव उडाल्यास.

## प्रतिबंधात्मक उपाय



- आपल्या कपडयांची काळजी घ्या. हातमोजे, गाऊन आणि ॲप्रन यांचा वापर करून रक्ताचा थेट संपर्क टाळा.



- जर हातमोजे नसतील तर प्लॉस्टिकच्या पिशवीने हाथ झाकून घ्या.
- निर्जंतूक साबणाने हात धुवा व कपडे बदला.
- फरशी, अंथरूण, स्वच्छतागृहे व भिंती यांच्या नेहमीच्या स्वच्छतेसाठी, क्लोरीन आधारित जंतुनाशकाचा तसेच डिटर्जंट व गरम पाण्याचा केलेला वापर पुरेसा असतो.



- दूषित घनकचरा, लिकप्रूफ भांडयात टाकून जाळून टाकला पाहिजे किंवा पाण्याच्या स्त्रोतापासून ३० फूट दूर व ७ फूट जमिनीत गाडून टाकला पाहिजे.



# एचआयव्ही आणि गुप्तरोगाचा संबंध


## गुप्तरोग हा मुख्यतः असुरक्षित लैंगिक संबंधातून पसरणाऱ्या रोगांचा समूह आहे.

### गुप्तरोगाचे प्रकारः





- सिफिलिस (गरमी)
- शांक्रॉइड (मृदवण)
- क्लॅमीडिया (धातू जाणे)
- जननेंद्रियाची हर्पिस (वेदनादायक व्रण)
- जांघेत गाठ
- गन्होरिया (परमा)
- जननेंद्रियाशी मस्सा



## गुप्तरोगांची समस्या कितपत आहे?

- महाराष्ट्राच्या शहरीभागात ६% लोकांमध्ये गुप्तरोगांचा प्रादूर्भाव आहे.
- पुरूषांपेक्षा स्त्रियांना जास्त सहजरीत्या गुप्तरोगांचा संसर्ग होतो.
- गुप्तरोग आणि एचआयव्ही या दोघांचाही संसर्ग असुरक्षित लैंगिक संबंधातून होतो.
- गुप्तरोग असल्यास एचआयव्हीचा संसर्ग आणि प्रसार होण्याचा धोका दहापट वाढतो.
- गुप्तरोगांवर लगेच योग्य व पूर्ण उपचार झाल्यास एचआयव्ही संसर्गाची शक्यता कमी होते.
- गुप्तरोगांवर योग्य उपचार उपलब्ध आहेत.


**गुप्तरोग आपोआप बरे होत नाहीत, त्यासाठी उपचारांची गरज असते.**

# एचआयव्ही संसर्गास प्रतिबंध

एकदा एचआयव्ही विषाणूंचा संसर्ग झाला की आयुष्यभर विषाणु शरीरात राहतात. त्यामुळे एचआयव्ही संसर्ग होऊ नये ही काळजी घेणे अत्यंत महत्वाचे आहे

## लैंगिक संबंधातून होणारा प्रसार थांबवण्यासाठी

- असुरक्षित लैंगिक संबधं टाळणे.
- अनोळखी व्यक्तीशी व अनेकांशी लैंगिक संबंध टाळावेत. संबंध ठेवल्यास प्रत्येक वेळी निरोधचा वापर करावा.


सुरक्षित लैंगिक संबंध


गरोदर स्त्रीला एआरटी उपचार देणे

## एचआयव्ही बाधित मातेकडून बाळाला लागण टाळण्यासाठी

गरोदर स्त्रीने लवकर नावनोंदणी करून आपली रक्तचाचणी करून घ्यावी. एचआयव्ही संसर्गाचे निदान झाल्यास, गरोदरपणाच्या चौथ्या महिन्यापासून एआरटी उपचार घेतल्याने बाळाला एचआयव्ही संसर्गाचा धोका खूप कमी होतो. जन्मानंतर बाळाला सुध्दा औषध सुरू केले जाते.

## एचआयव्ही संसर्गमुक्त 'सुरक्षित' रक्त गरजू व्यक्तींस द्यावे.

- रक्त नेहमी सरकारी वा सरकारमान्य रक्तपेढीतूनच घ्यावे. कारण या रक्तपेढंयातून रक्ताची एचआयव्ही व इतर आवश्यक चाचण्या केल्या जातात.
- डॉक्टराकडे इंजेक्शन घेताना, सुई व सिरींज उकळून निर्जंतुक केली आहे ना किंवा नवी वापरल्याची खात्री करावी.



# मुंबई जिल्हे एड्स नियंत्रण संस्थेमार्फत

## दिल्या जाणाऱ्या आरोग्यसुविधा

**शक्ती क्लिनीक** – मुंबईतील सर्व सरकारी / महानगरपालिका रूग्णालयात एकात्मिक एचआयव्ही समुपदेशन व रक्तचाचणी सेवा विनामूल्य उपलब्ध आहे.
कोणतीही व्यक्ती आपली एचआयव्ही चाचणी या केंद्रात करू शकते. त्याच दिवशी रक्तचाचणीचा रिपोर्ट दिला जातो व ही माहिती पूर्णपणे गोपनीय ठेवली जाते.

**सुरक्षा क्लिनीक** – मुंबईतील २७ रूग्णालयांमध्ये गुप्तरोगांसाठी चाचणी, उपचार व समुपदेशन सेवा उपलब्ध आहेत.

**एआरटी उपचार केंद्र** – एचआयव्ही बाधित व्यक्तींना त्यांच्या प्रतिकारशक्ती (CD४) नुसार विनामूल्य एआरटी उपचार सुरू केले जातात. आयुष्यभर नियमितपणे घ्यावयाच्या या उपचारांमुळे शरीरातील एचआयव्ही विषाणूंची संख्या नियंत्रित राहते व एड्सचा आजार लांबणीवर टाकता येतो.

**रक्तसुरक्षा**– मुंबईतील सर्व रक्तपेढयांतून संकलित रक्ताची एचआयव्ही, कावीळ– ब व क यांची चाचणी करणे व संसर्गमुक्त रक्ताचा पुरवठा गरजू रूग्णांना करणे.

साधन
हेल्पलाइन
022-2411 4000

या हेल्पलाईन द्वारे एचआयव्ही/एडस संबंधी माहिती, नजिकच्या शक्ती क्लिनिक व इतर सुविधांची माहिती मिळू शकते.